लोकमत

# डॉ. सुमन बुवा यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



आजीवन अध्ययन व विस्तार विभागात २९ वर्ष कार्यरत असणाऱ्या सहायक प्राध्यापिका डॉ. सुमन कृष्णा बुवा यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. आजरा तालुक्यातील निंगुडगे हे डॉ. बुवा यांचे मूळ गाव. एम.एस.डब्लू. या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या डॉ. बुवा यांनी समाजकार्य विषयातून डॉक्टरेट मिळवली होती. त्यांनी राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय पातळीवर शोधप्रबंध सादर केले होते. विविध पुस्तकांचे लेखनही केले होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. यावेळी विभागातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. सुमन बुवा यांचे निधन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील सहायक प्रा. डॉ. सुमन कृष्णा बुवा (वय ५८) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे आई, बहीण, भाऊ, भावजय असा परिवार आहे. आजरा तालुक्यातील निंगुडगे त्यांचे मूळ गाव. त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शोधप्रबंध सादर केले. विविध पुस्तकांचे लेखन केले.

पुण्यनगरी

# डॉ. सुमन बुवा यांचे निधन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात २९ वर्षे कार्यरत असणाऱ्या सहायक प्राध्यापिका डॉ. सुमन कृष्णा बुवा यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. आजरा तालुक्यातील निंगुडगे हे डॉ. बुवा यांचे मूळ गाव. एमएसडब्ल्यू या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या डॉ. बुवा यांनी समाजकार्य विषयातून डॉक्टरेट मिळवली होती. गुरुवारी (दि. ५) मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, सकाळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पार्थिवाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

तरूण भारत

# डॉ. सुमन कृष्णा बुवा यांचे निधन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागप्रमुख डॉ. सुमन



कृष्णा बुवा यांचे (वय ५७, रा. सायबर चौक, काटकर अपार्टमेंट) अल्पशा आजाराने निधन झाले. गुरूवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर आजरा तालुक्यातील निंगुडगे या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, बहिण, दोन भाऊ असा परिवार आहे. १३ आक्टोबर रोजी दशक्रिया विधी निंगुडगे येथे होणार आहे. डॉ. बुवा विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात गेल्या २९ वर्षापासून कार्यरत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

तरूण भारत

# 'पदवी प्रथम, व्दितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयात घ्या'

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी पारंपारिक अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय वर्ष व शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर घेण्याचा विचार विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. सर्व शाखा, बी. बी. ए., बी. सी. एस., बी. ए. बी. एड, बी. डेस., बी. एफ. टी. एम., बी. डी. एफ. सी., बी. आय. डी., बी. एस., डब्ल्यू., सर्व बी. व्होक पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रम व शिक्षणशास्त्र प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर घेण्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाने सुचवले आहे. तसेच सर्व विषयाचे वेळापत्रक,



प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे आणि पेपर तपासणी करून गुणपत्रिका तयार करण्याचे काम महाविद्यालय पातळीवर करावयाचे आहे. तरी महाविद्यालयांनी ऑक्टोबर २०२३ हिवाळी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय पातळीवर करावयाचे आहे.

यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे, याची दखल महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.